महाराष्ट्र शासन
पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर-431001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :- cp.aurangabad@mahapolice.gov.in

क्र.कक्ष-१०/कारागृह शिपाई/भरती-प्रेसनोट/२०२४/ 13874 छत्रपती संभाजीनगर,दि. २८.०८.२०२४

## प्रेस नोट

कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील 315 रिक्त कारागृह शिपाई पदांकरीता 70333 उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केलेले आहेत. कारागृह शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेमध्ये दि.28.06.2024 ते दि.05.08.2024 या कालावधीत विभागीय क्रिडा संकुल, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर या मैदानावर शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी घेण्यात आलेली आहे. कारागृह शिपाई पदाच्या मैदानी चाचणी करीता एकुण 39676 उमदेवार उपस्थित राहुन मैदानी चाचणी पुर्ण केलेली आहे. मैदानी चाचणी पुर्ण केलेल्या उमेदवारांपैकी 30714 उमेदवारांनी मैदानी चाचणीमध्ये 50% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले आहे अशा उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कारागृह शिपाई पदाच्या शारीरिक चाचणीमध्ये उत्तीर्ण होवुन लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारातुन जाहिरातीमधील सामाजिक व समांतर आरक्षणानुसार 1:10 प्रमाणातील 5720 उमेदवारांची यादी या कार्यालयाचे https://aurangabadcitypolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेली आहे.

लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या एकुण 5720 उमेदवारांची लेखी परिक्षा ही दि. 1.9.2024 रोजी खालील नमुद परिक्षा केंद्रामध्ये घेण्यात येणार आहे.

| अ.क्र. | उमेदवार संख्या | परिक्षेचा दिनांक | परिक्षेचा वेळ व रिपोर्टीग वेळ | लेखी परिक्षेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | **महिला** उमेदवार एकुण 1244 | दि. 01.09.2024 | दुपारी 03.00 वा. परिक्षा केद्रावर उपस्थित राहण्याची वेळ दुपारी 12.00 | महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बीड बायपास रोड, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर - 4310010. |
| 2 | **पुरुष** उमेदवार एकुण 4476 | दि. 01.09.2024 | दुपारी 03.00 वा. परिक्षा केद्रावर उपस्थित राहण्याची वेळ दुपारी 12.00 | मराठावाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, देवगिरी महाविद्यालय, रेल्वे स्टेशन रोड, विटस हॉटेल जवळ, छत्रपती संभाजीनगर- 431005. |

लेखी परिक्षेस पात्र असलेल्या उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर नमुद दिनांक, वेळ व ठिकाण उपस्थित रहाणे बाबत लेखी परिक्षेचे प्रवेश पत्र महाआयटी विभागाकडुन निर्गमित करण्यात आलेले आहे. सर्व उमेदवारांना दुपारी 12.00 ते दुपारी 02.00 वाजेपावेतो परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल. दुपारी 02.00 वाजेनंतर येणाऱ्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

उमेदवारांना लेखी परिक्षेकरिता या कार्यालयाकडुन परिक्षा पॅड व ब्लॅक बॉल पेन पुरविण्यात येणार आहे. उमेदवारांनी लेखी परिक्षेकरिता येतांना सोबत लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र, मैदानी चाचणीचे प्रवेश पत्र व 2 पासपोर्ट फोटो (मैदानी चाचणी करिता जे आणलेले होते तेच) घेवुन यावे.

इतर कोणतेही किंमती वस्तु कॅल्क्युलेटर, स्मार्टवॉच, मोबाईल फोन, हेडफोन, ब्ल्युटुथ-हेडफोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तु सोबत बाळगु नये. सदरचे उपकरणे उमेदवाराजवळ आढळुन आल्यास त्यांना भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. तसेच त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

मा. प्रवीण पवार, भापोसे, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर तथा दक्षता अधिकारी व निवड मंडळातील सदस्य यांच्या मार्गदर्शना खाली कारागृह शिपाई पदाची लेखी परिक्षा अतिशय पारदर्शकपणे व नि:पक्षपातीपणे घेण्यात येणार आहे.

(शिलवंत नांदेडकर)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.